अग्निशमन सल्लागार आणि आयोजक
मुंबई
जावक क्र. 851
दिनांक 3 MAY 2013
फाईल क्र.
कायम लिपिक सही

Seen by
F.A.
S.I
O.S.
Action by

बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीमधील उंच इमारतींच्या बांधकाम प्रस्तावांच्या छाननीसाठी सध्याच्या व्यवस्थेचे पुनर्विलोकन करुन शिफारसी करण्यासाठी तांत्रिक अभ्यासगटाची स्थापना...

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्र. टिपीबी-४३१३/ प्र.क्र.४१/२०१३/नवि-११**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक — २ एप्रिल, २०१३.**

वाचा :- १) शासन निर्णय क्र. टिपीबी-४३०३/ प्र.क्र.४/०३/नवि-११, दिनांक १०/०१/२००३.
२) शासन निर्णय क्र. टिपीबी-४३०३/४९/प्र.क्र.४/०३/नवि-११, दिनांक २८/७/२००४.
३) शासन निर्णय क्र. टिपीबी-४३०७/१०२४/प्र.क्र.१५५/०७/नवि-११, दिनांक २७/७/२००७.
४) शासन निर्णय क्र. टिपीबी-४३०३/४९/प्र.क्र.४/०३/नवि-११, दिनांक ३/९/२०१०.

**प्रस्तावना :-**

शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीबी-४३०३/४९/प्र.क्र.४/०३/नवि-११, दिनांक १०/१/२००३ अन्वये मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली मुंबईतील उंच इमारतींसंदर्भात अहवाल सादर करणेसाठी यापूर्वी अभ्यासगट नियुक्त करण्यात आलेला होता. सदर अभ्यासगटाच्या शिफारशी विचारात घेवून शासनाने समक्रमांकाच्या दि. २८/७/२००४ च्या शासन निर्णयान्वये मुंबई महानगरपालिका हद्दीमधील ७० मीटर पेक्षा जास्त उंच इमारतींच्या बांधकाम प्रस्तावांची छाननी करण्यासाठी तांत्रिक समितीची नियुक्ती केली होती. सदर समितीचा कालावधी ३ वर्षांचा होता. त्यानंतर दि. २७/७/२००७ व दि. ३/९/२०१० च्या संदर्भिय शासन निर्णयान्वये सदर समितीची पुनर्रचना करण्यात आलेली आहे. तथापी समितीच्या कार्यकक्षेमध्ये बदल करण्यात आलेला नाही.

मध्यंतरीचे कालावधीमध्ये शासनास सदर समितीच्या कार्यकक्षेचे पुनर्विलोकन करण्यासंबंधी तसेच समितीच्या कार्यपध्दतीमध्ये अधिक सुस्पष्टताआणण्याविषयी मागणी प्राप्त झालेली आहे.

वरील बाबींचा विचार करता बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीमधील उंच इमारतींच्या बांधकाम प्रस्तावांच्या तांत्रिक छाननी संदर्भात सध्याच्या व्यवस्थेचा अभ्यास करुन उपयुक्त उपाययोजना सुचविण्यासाठी एक तांत्रिक अभ्यासगट नेमण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत विचारांती शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे :-

**शासन निर्णय :-**

बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीमधील उंच इमारतींच्या बांधकाम प्रस्तावांच्या तांत्रिक छाननी संदर्भात सध्याच्या व्यवस्थेचा अभ्यास करुन त्यात आवश्यक त्या सुधारणा सुचविण्यासाठी मुख्य

सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे तांत्रिक अभ्यासगटाची स्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.--

| | | |
|---|---|---|
| १) | मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई. | अध्यक्ष |
| २) | महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई. | सदस्य |
| ३) | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका. | सदस्य |
| ४) | प्रधान सचिव, (नवि-१) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ५) | प्रधान सचिव , गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ६) | सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ७) | सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ८) | संचालक, अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प, बृहन्मुंबई महानगरपालिका. | सदस्य |
| ९) | संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य |
| १०) | संचालक,नगर रचना तथा सहसचिव,नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई. | सदस्य सचिव |
| ११) | संचालक, अग्नि सुरक्षा सेवा, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई. | सदस्य |
| १२) | मुख्य अग्निशमन अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका. | सदस्य |
| १३) | विभाग प्रमुख, स्थापत्य अभियांत्रिकी, आय.आय.टी. पवई, मुंबई | सदस्य |
| १४) | अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर्स ऑफ हाऊसिंग इंडस्ट्रिज, मुंबई. | निमंत्रित |
| १५) | अध्यक्ष, क्रेडाई (CREDAI), मुंबई. | निमंत्रित |
| १६) | अध्यक्ष,पिएटा (प्रॅक्टीसिंग इंजिनिअर्स, आर्किटेक्टस् अॅन्ड टाऊन प्लानर्स असोसिएशन) इंडिया, मुंबई. | निमंत्रित |

०२. **अभ्यासगटाची कार्यकक्षा :-**

सदर अभ्यास गटाची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील.

(i) गेल्या दशकात उंच इमारतीच्या बांधकाम प्रणालीत व तद्संबंधित तंत्रज्ञानात झालेल्या सुधारणा तसेच अग्निशमन /अग्निप्रतिबंधक उपाययोजना हयामध्ये झालेली प्रगती यांचा विचार करता उंच इमारतीच्या सध्याच्या व्याख्येमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत अभ्यास करुन उचित शिफारशी करणे.

(ii) बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील उंच इमारतींच्या बांधकाम प्रस्तावांची छाननी करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या "हाय राईज समिती" च्या कार्यकक्षेचा व कार्यपध्दतीचा अभ्यास करणे आणी त्यामध्ये सुधारणा आवश्यक असल्यास त्याप्रमाणे शिफारशी करणे.

(iii) सदर "हाय राईज समिती" उंच इमारतींच्या बांधकाम प्रस्तावांना मान्यता देतांना तपासत असलेल्या बाबी व इतर विभाग/ प्राधिकरण अशा बांधकाम प्रस्तावासंदर्भात तपासत असलेल्या बाबी यामध्ये पुनरावृत्ती आहे किंवा कसे याचा अभ्यास करुन पुनरावृत्ती टाळण्याबाबत उपाययोजना सुचविणे.

०३. सदर तांत्रिक अभ्यासगटाने आपला अहवाल सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून दोन महिन्यात शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नावाने.

( संजय बाणाईत )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा. राज्यमंत्री ( नगर विकास ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

D:\CAMP UD-11\UD-11\NOTE\Pawar\Note.doc

३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
४) महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
५) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका.
६) प्रधान सचिव ( नगर विकास-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) प्रधान सचिव ( नगर विकास-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई
९) सचिव, पर्यावरण विभाग , मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) संचालक, अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प, बृहन्मुंबई महानगरपालिका
१२) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) संचालक, नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) संचालक, अग्नि सुरक्षा सेवा, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई
१५) मुख्य अग्निशमन अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका.
१६) विभाग प्रमुख, स्थापत्य अभियांत्रिकी, आय.आय.टी. पवई, मुंबई
१७) अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर्स ऑफ हाऊसिंग इंडस्ट्रिज, मुंबई.
१८) अध्यक्ष, क्रेडाई (CREDAI), मुंबई.
१९) अध्यक्ष, पिएटा (प्रॅक्टीसिंग इंजिनिअर्स, आर्किटेक्टस् ॲन्ड टाऊन प्लानर्स असोसिएशन) इंडिया, मुंबई.
२०) कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-२९, यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णय विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावा.
२१) निवडनस्ती (नवि-११)